MHPA170017102022

दाखल तारीखः- २२/०९/२०२२
नोंदणी तारीखः- २२/०९/२०२२
निकाल तारीखः- ०५/०६/२०२६
कालावधीः- ०३ ०८ १४
वर्षे महिने दिवस

**विद्यामान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, जिंतुर, जि.परभणी यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः- नि.प्र.तळणीकर)

**म.सं.कौ.हि.अर्ज क्र.३३/२०२२** **निशाणी क्र.२६**

१. सौ. अंकिता रामकिशन सुर्वे,
वय-२८ वर्षे, धंदा-घरकाम.
२. पुर्वा रामकिशन सुर्वे, **...अर्जदार**
वय-०५ वर्षे, अ.पा.क.अर्जदार क्र.१.
३. ईश्वरी रामकिशन सुर्वे,
वय-०४ वर्षे, अ.पा.क.अर्जदार क्र.१.
सर्व रा.आडगाव तांडा, तह.जिंतुर, जि.परभणी.

**विरुध्द**

१. रामकिशन तुकाराम सुर्वे,
वय ३० वर्षे, धंदा. जे.सी.बी.चालक.
२. शांताबाई तुकाराम सुर्वे,
वय ४५ वर्षे, धंदा.घरकाम. **...गैरअर्जदार**
दोघे रा. येलदरी कॅम्प, तह.जिंतुर, जि.परभणी.

**कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम १२ अन्वये अर्ज**

.................................................................................................................

अर्जदारांतर्फेः–      श्री. टी. एम. घनसावध, अधिवक्ता

गैरअर्जदारांतर्फेः–   श्री. ए. एस. पौळे, अधिवक्ता

.................................................................................................................

## न्यायनिर्णय

(दिनांक ०५ जुन, २०२६ रोजी पारीत)

१.    अर्जदार यांनी गैरअर्जदारांविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम (यापुढे थोडक्यात ''अधिनियम'') चे कलम १२ नुसार प्रस्तुतचे प्रकरण संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत दाखल केले आहे.

२.    **अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की–**

अर्जदार क्र.१ (यापुढे थोडक्यात "अर्जदार") ही गैरअर्जदार क्र.१ (यापुढे थोडक्यात "गैरअर्जदार") याची लग्नाची पत्नी असुन अर्जदार क्र.२ आणि ३ या अर्जदार आणि गैरअर्जदार यांच्या मुली आहेत. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदार हिची सासु म्हणजेच गैरअर्जदार याची आई आहे. अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदारासोबत दिनांक १२/०५/२०१५ रोजी मौजे आडगाव तांडा, ता.जिंतुर येथे पार पडले व लग्नात अर्जदाराच्या आई वडीलांनी अर्जदार हिला संसारउपयोगी सर्व साहित्य दिले. लग्नानंतर काही दिवसांनी गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला त्रास देण्यास सुरुवात केली. अर्जदार हिला गैरअर्जदाराने नेहमी दारु पिवुन शिवीगाळ करुन मारहाण केली, तिला संसार करण्याकरीता पैसे दिले नाहीत, तिच्या चारित्र्यावर संशय घेतला, हुंडा कमी दिला म्हणुन अपमान केला, अर्जदाराला मुलगा होत नाही म्हणुन तिला मानसिक त्रास दिला, अर्जदाराला घाण शिव्या

देण्यात आल्या, अर्जदाराला सासरी राहु नको असे सांगण्यात आले, ऑगस्ट २०२२ मध्ये पुणे येथे राहत असताना अर्जदाराने गैरअर्जदाराला व्यसनाच्या कारणावरुन पैसे न दिल्याने गैरअर्जदाराने तेथुन पळ काढला व त्यानंतर तो अर्जदाराला भेटला नाही, अर्जदाराचा सांभाळ करण्यात आला नाही, अर्जदाराला तिच्या आई वडीलांना भेटु देण्यात आले नाही, अर्जदार संसार करत असताना साधारण दोन ते तीन वेळेस रात्री अपरात्री तिला गैरअर्जदाराने घराबाहेर हाकलुन दिले, अर्जदाराच्या मोलमजुरीचे पैसे बळजबरीने हिसकावुन घेण्यात आले आणि अर्जदाराच्या अंगावरील दागिने गैरअर्जदाराने घेवुन विकुन टाकले. अशाप्रकारे गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा शारीरीक, मानसिक आणि आर्थीक छळ करुन अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे. अर्जदार हिची मोठी मुलगी तेजल वय ०७ वर्ष ही गैरअर्जदाराकडे आहे व तिचा ताबा गैरअर्जदार अर्जदाराला देत नाही. अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी हालाकीचे जिवन जगत आहे व गैरअर्जदार हा व्यवसायाने जे.सी.बी. चालक असुन तो वर्षाला अंदाजे ₹३,५०,०००/- कमवितो. करीता, अर्जदार हिने संरक्षण आदेश, वैकल्पीक निवासाचा आदेश, प्रतिमाह ₹३०,०००/- पोटगी मिळण्याचा आदेश, आर्थीक सहाय्य देण्याचा आदेश, मुलीचा तात्पुरता ताबा देण्याचा आदेश आणि नुकसान भरपाई मिळण्याच्या आदेशाची मागणी केली आहे.

३. **<u>गैरअर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की–</u>**

गैरअर्जदार हे प्रकरणात हजर झाले व त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल करुन अर्जदाराच्या अर्जास व तिने केलेल्या मागणीस विरोध केला आहे. गैरअर्जदारांनी कथन केले की, लग्न झाल्यापासुन अर्जदार हिला आजपर्यंत त्यांनी व्यवस्थीतपणे नांदवले आहे. अर्जदाराला त्यांनी

कुठल्याही प्रकारचा त्रास दिला नाही. अर्जदार क्र.३ हिची अर्जदार हिने भावकीतील लोकांना विक्री केली आहे. सध्या अर्जदाराजवळ तेजल आणि पुर्वा या दोन मुली आहेत. अर्जदार ही दारु पिते व तिने स्वतःहुन संसाराचा त्याग केला आहे. अर्जदार ही सन २०२० पासुन माहेरी राहत आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराला नांदविण्याबाबत बरेच प्रयत्न केले. परंतु, अर्जदार ही नांदायला तयार नाही. गैरअर्जदार आजही अर्जदार हिला नांदविण्यास तयार आहेत. अर्जदार ही शारीरीक कष्टाचे काम करते. गैरअर्जदार हा रोज मजुरीचे कामकाज करतो व तो अशिक्षित आहे. गैरअर्जदाराची आर्थीक स्थीती बिकट आहे व तो अतिक्रमीत जमिनीवर बेकायदेशीररीत्या तात्पुरत्या निवा–यात त्याच्या आईसोबत राहत आहे. अर्जदार ही कामधंदा करण्यास सक्षम असुन ती धडधाकट आहे. अर्जदाराने अवास्तव काल्पनिक कथन तिच्या अर्जात लिहिले आहे. गैरअर्जदाराकडे स्थावर व जंगम मालमत्ता नाही. याकारणास्तव, अर्जदार ही गैरअर्जदाराकडुन अर्जात कथन केल्याप्रमाणे कुठलीच मागणी करु शकत नाही.

४. उपस्थित मुद्दे व त्यावरील कारणमिमांसासह दिलेले निष्कर्ष येणे प्रमाणे–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | गैरअर्जदारांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराने सिध्द केले आहे काय? | ... | होय. |
| २. | अर्जदार कलम १८ नुसार संरक्षणाचा आदेश मिळण्यास हक्कदार आहे काय? | ... | होय. |
| ३. | अर्जदार कलम १९ अन्वये निवाऱ्याचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | ... | होय. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | अर्जदार कलम २० अन्वये निर्वाहाचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | ... | होय. |
| ५. | अर्जदार कलम २२ अन्वये नुकसान भरपाईचा आदेश मिळण्यास हक्कदार आहे काय? | ... | नाही. |
| ६. | अर्जदार कलम २१ अन्वये मोठी मुलगी तेजल हिचा तात्पुरता ताबा मिळविण्यास पात्र आहे काय? | ... | होय. |
| ७. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

५. अर्जदाराने तिच्या अर्जाचे समर्थनार्थ तिला स्वतःला पुरावा प्रतिज्ञालेख (नि.क्र.१४) आणि तिचे आजोबा नामे बाजीराव फकीरा मिटकर (सा.क्र.२) याचा पुरावा प्रतिज्ञा लेख (नि.क्र.१५) दाखल करुन यांना तपासले. अर्जदाराने राजाराम धोत्रे याचा पुरावा प्रतिज्ञालेख दाखल केला परंतु सदर साक्षीदार उलटतपासासाठी हजर झाला नाही. अर्जदाराने पुरसीस (नि.क्र.२२) दाखल करुन तिचा पुरावा बंद केला आहे. गैरअर्जदाराने त्याचा पुरावा प्रतिज्ञालेख (नि.क्र.२४) दाखल केला परंतु तो उलटतपासासाठी हजर न झाल्याने न्यायालयाने नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन गैरअर्जदारांचा पुरावा बंद केला आहे.

६. अर्जदार हिच्या पुराव्यातुन गैरअर्जदाराने अर्जदाराच्या नावावर दिनांक २७/०४/२०२२ रोजी करुन दिलेल्या नोटरीकृत कबुली जबाबाची पडताळणी केलेली प्रत (नि.क्र.२०) हा दस्तऐवज सिध्द होत आहे. गैरअर्जदाराकडुन प्रकरणात कुठलेही दस्तऐवज सिध्द झालेले नाहीत.

७. **<u>मुद्दे क्र.१ आणि २ करीता–</u>**

अर्जदार हिने तिच्या पुरावा प्रतिज्ञालेखात तिच्या अर्जातील नमुद मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. अर्जदार हिने उलटतपासात कबुल केले की ती आई वडीलांकडे कोणत्या तारखेपासुन, महिन्यापासुन व वर्षापासुन राहते ते तिला सांगता येणार नाही. संरक्षण अधिकारी यांच्याकडे तिने कोणत्या तारखेला अर्ज दिला व संरक्षण अधिकारी तिच्याकडे एकदा केव्हा आले त्याची तारीख ती सांगु शकत नाही. त्याचप्रमाणे संरक्षण अधिकारी कोणत्या तारखेला गैरअर्जदाराकडे गेले ते तिला माहिती नाही. तिला संरक्षण अधिका–याने तो गैरअर्जदाराकडे गेले असल्याबाबत काही सांगितले नाही. तिने पोलिसांकडे गैरअर्जदारांविरुध्द साधारण दोन वर्षापुर्वी तक्रार केली परंतु तिला तारीख आठवत नाही. तिला पोलिसांनी सरकारी दवाखान्यात तपासणीसाठी पाठवले नाही. तिने मारहाणीबाबत खाजगी दवाखान्यात दाखवले नाही व वैद्यकीय कागदपत्रे दाखल केली नाहीत. गैरअर्जदार हा तिला नांदवण्याकरीता गावातील प्रतिष्ठीत लोक घेवन आला होता.

८. सा.क्र.२ याने त्याचा पुरावा प्रतिज्ञालेख दाखल करुन अर्जदार हिच्या अर्जाचे समर्थन केले आहे. त्याने उलटतपासात कबुल केले की, अर्जदार ही त्याची नात असुन तिला मारहाण व पैशांची मागणी झाल्याची तारीख, महिना व वर्ष तो सांगु शकत नाही.

९. प्रस्तुतच्या प्रकरणात अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिद्ध करण्याकरीता सर्वप्रथम ती गैरअर्जदार यांच्यासोबत एकाच छताखाली राहिल्याचे सिद्ध करणे आवश्यक आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार ही त्यांच्यासोबत एकाच छताखाली न राहिल्याबाबत कुठलेही कथन लेखी जबाबात केलेले नाही. अर्जदाराच्या पुराव्यातुन ती गैरअर्जदारांसोबत राहिली असल्याचे सिध्द होत आहे व उलटतपासाचा विचार केल्यावर सुध्दा सदरची बाब अबाधित ठरते.

अर्जदाराने मारहाणीबाबत पोलिस तक्रार केली असल्याचा निष्कर्ष तिच्या उलटतपासातुन पुढे येत आहे. परंतु, पोलिसांनी तिला सरकारी दवाखान्यात पाठवले नसल्याचे व तिने सुध्दा मारहाणीबाबत कुठलीही वैद्यकीय कागदपत्रे दाखल केली नसल्याचे दिसत आहे. परंतु, नि.क्र.२० चे अवलोकन केले असता त्यावरुन असे स्पष्ट होते की दिनांक २७/०४/२०२२ रोजी गैरअर्जदाराने अर्जदाराच्या नावे कबुली जबाब लिहुन दिला. त्यामध्ये गैरअर्जदाराने कबुल केले की त्याने दारुच्या नशेमध्ये अर्जदाराला शिवीगाळ करुन मारहाण करुन घराबाहेर काढुन दिले. त्याचप्रमाणे गैरअर्जदाराने कबुल केले की तो दारु पिवुन नशा करणार नाही, अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाण करणार नाही, तिला घालुन पाडुन टोचुन बोलणार नाही, घरातील संसारउपयोगी साहित्य व औषधोपचार वेळेवर करेल. यावरुन असे दिसुन येते की गैरअर्जदारांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे. अर्जदार आणि सा.क्र.२ हे जरी त्यांच्या उलटतपासात घटनेच्या तारखा सांगण्यात अपयशी ठरले असले तरी सुध्दा त्यांच्या पुराव्यातुन अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब सिध्द होत आहे.

१०. गैरअर्जदारांनी अर्जदाराने सिध्द केलेल्या आरोपांचे खंडण करण्यासाठी त्यांचा पुरावा न्यायालयासमक्ष दिला नाही. अर्जदार ही लग्न झालेली त्यातल्या त्यात लहान मुली असलेली स्त्री असून साधारण कोणतीही लग्न झालेली व लहान मुली असलेली स्त्री तिच्या सासरचे घर सोडून माहेरी रहावयास जाणार नाही. गैरअर्जदार यांनी त्यांच्या कृतीमुळे अर्जदार हिला माहेरी राहण्यास भाग पाडले असल्याचे एकंदरीत पुराव्यातुन दिसून येते. अर्जदार हिच्यावर गैरअर्जदार यांनी शारिरीक, मानसिक व आर्थीक स्वरुपाचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिद्ध होत आहे. करीता,

मुद्दा क्र.१ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवण्यात येतो. अर्जदार हिने तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब सिद्ध केली असल्यामुळे तिला न्यायालयाद्वारे संरक्षणाचा आदेश मिळणे आवश्यक आहे. करीता मुद्दा क्र.२ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवण्यात येत आहे.

११. **मुद्दे क्र.३ व ४ करीता–**

अर्जदार हिने तिच्या उलटतपासात कबुल केले आहे की, तिला गैरअर्जदाराच्या घराचे क्षेत्रफळ सांगता येणार नाही व ते बांधकाम आर.सी.सी. चे नाही. ते घर गैरअर्जदार क्र.२ च्या नावाने असुन तिने त्या घराबाबत पुरावा दाखल केलेला नाही. ती मुंबई येथे गैरअर्जदाराकडे नांदत असताना घरकाम करायची. सा.क्र.२ याने त्याच्या पुराव्यात कथन केले की त्याला गैरअर्जदाराच्या मालकीचे घर कीती क्षेत्रफळाचे आहे ते माहिती नाही. तो त्याच्याकडे कधीही गेला नाही. अर्जदार ही मुंबई येथे रोजंदारीचे काम करते. लग्नात वस्तुंची पावती तयार केली होती. अर्जदार व सा.क्र.२ यांनी उलटतपासात दिलेल्या स्विकृंतीवरुन असे दिसुन येते की अर्जदार ही कामकाज करण्यास सक्षम आहे व ती उदरनिर्वाहासाठी काम करत आहे. परंतु, एकंदरीत पुराव्याची परिस्थीती लक्षात घेता असे दिसुन येते की तसे करण्याकरीता अर्जदार ही गैरअर्जदारांच्या कृत्यामुळे बाध्य झाली आहे. अर्जदारास दोन लहान मुलींचा सुध्दा सांभाळ करावा लागतो. अर्जदाराने गैरअर्जदार याच्या व्यवसायाबाबत कागदोपत्री पुरावा दिलेला नसला तरी सुध्दा नि.क्र.२० वरील कबुली जबाबात गैरअर्जदाराने त्याचा व्यवसाय मजुरी व जे.सी.बी. चालक म्हणुन दाखवलेला आहे. त्यावरुन असे दिसुन येते की गैरअर्जदार हा निश्चीतच वर्षाला जे.सी.बी. चालक व इतर कामकाज करुन अंदाजे ₹३,००,०००/– ते ₹३,५०,०००/– कमवित असावा. गैरअर्जदाराने त्याच्या उत्पन्नाबाबत

कुठलाही पुरावा दिलेला नाही. अर्जदार अंशतः स्वतःचा उदरनिर्वाह करु शकत असल्याचा निष्कर्ष निघत आहे. परंतु, अर्जदार नांदत असताना ज्या जीवनशैलीत होती त्याचप्रकारची जीवनशैली तिला प्रदान करणे आवश्यक आहे. सा.क्र.२ याने कबुल केले आहे की अर्जदार ही मुंबई येथे रोजंदारीचे काम करते. परंतु त्यावरुन अर्जदार हीची निवाऱ्याच्या व्यवस्थेची मागणी योग्य नसल्याचा निष्कर्ष पुढे येत नाही. अशा परीस्थीतीत दोन्ही पक्षांची जबाबदारी, उत्पन्नाची क्षमता, गरज आणि राहणीमानाचा दर्जा लक्षात घेउन गैरअर्जदार हा अर्जदार हिला महिन्याला सहज रित्या ₹२०००/– आणि अर्जदार क्र.२ आणि ३ यांना महिन्याला ₹१०००/– प्रत्येकी देउ शकतो असा निष्कर्ष निघतो व तसा आदेश होणे न्याय्य व योग्य ठरेल. अर्जदार हिने तिचा निवास आडगाव तांडा या छोटया खेडयात दाखवला आहे. त्यामुळे गैरअर्जदार याने अर्जदार हिला स्वतंत्र निवासाची व्यवस्था म्हणुन ₹१०००/– दरमहा घरभाडे स्वरुपात देणे आवश्यक दिसून येते व तसा आदेश पारीत होणे न्याय्य व योग्य ठरेल. या कारणास्तव मुद्दा क्र.३ आणि ४ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवण्यात येत आहे.

१२. **मुद्दे क्र.५, ६ आणि ७ करीता–**

अर्जदार हिने तिचे आर्थिक, मानसिक व वैद्यकीय नुकसान झाल्याबाबत व तीला खर्च आल्याबाबत कुठलाही दस्तऐवज न्यायालयासमक्ष सिद्ध केला नाही. त्याबाबत योग्य पुरावा न्यायालयासमक्ष आला नसल्याने अर्जदाराची नुकसान भरपाईची मागणी न्यायालय मान्य करु शकत नाही. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार यांच्या मालकीच्या/ राहत्या घराबाबत कुठलेही दस्तऐवज दाखल नाहीत. त्यामुळे न्यायालय घराबाबत कुठलाही मनाई हुकुमाचा आदेश गैरअर्जदारांविरुध्द

पारीत करु शकत नाही. अर्जदार हिच्या पुराव्यातुन गैरअर्जदार हा व्यसन करत असल्याचे सिध्द होत आहे. अर्जदार हिची मुलगी तेजल ही गैरअर्जदारांसोबत रहात असल्याचे सिध्द होत आहे. गैरअर्जदार याने त्याच्या लेखी जबाबात तेजल सध्या अर्जदाराकडे असल्याबाबत कथन केले आहे. त्यामुळे कु.तेजल हिचे वय ०७ वर्ष असले तरी तिच्या सुरक्षेसाठी भविष्याचा विचार करुन तिचा तात्पुरता ताबा अर्जदार हिला देणे योग्य ठरेल असा निष्कर्ष समोर येत आहे. करीता, मुद्दा क्र.५ बाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्या क्र.६ बाबत होकारार्थी निष्कर्ष आणि मुद्दा क्र.७ बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला दरमहा ₹२०००/– (दोन हजार रुपये फक्त) आणि अर्जदार क्र.२ आणि ३ यांना दरमहा ₹१०००/– (एक हजार रुपये फक्त) प्रत्येकी पोटगी स्वरुपात अर्ज दाखल तारखेपासून द्यावेत.

३. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांना स्वतंत्र निवासाची व्यवस्था म्हणुन दरमहा ₹१०००/– (एक हजार रुपये फक्त) घरभाडे स्वरुपात अर्ज निकाल तारखेपासून द्यावेत.

४. गैरअर्जदार व त्याचे नातेवाईक यांना सुचित करण्यात येते की या पुढे त्यांनी अर्जदार यांच्यावर कुठल्याही स्वरुपाचा कौटुंबिक हिंसाचार करु नये व अर्जदार राहत असलेल्या ठिकाणी त्यांनी शिरकाव करु नये व तसे केल्यास संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही अर्जदाराच्या तक्रारीवरुन करावी.

५. अर्जदारांची गैरअर्जदारांच्या मिळकतीबाबत हस्तांतरण करण्यास मनाई करण्याची मागणी तसेच आर्थिक, मानसिक आणि वैद्यकीय खर्च नुकसानभरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.

६. गैरअर्जदार यांनी आजपासुन एक महिन्याच्या कालावधीमध्ये कु.तेजल रामकिशन सुर्वे, वय ०७ वर्ष, हिचा तात्पुरता ताबा अर्जदार हिला द्यावा.

७. न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना मोफत पुरवण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात थेट संगणकावर निर्देषीत आणि टंकलिखीत करण्यात आला.)

Digitally signed by NIKHIL PRADEEP TALNIKAR
Date: 2026.06.05 13:59:09 +0530

(नि. प्र. तळणीकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
जिंतुर.

दिनांक–०५/०६/२०२६

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | Ku. S.V. Vishnupurikar |
| Court Name | :- | Judicial Magistrate F.C., Jintur |
| Dictated on | :- | 05/06/2026 |
| Checked on | :- | 05/06/2026 |
| Signed by Presiding Officer on | :- | 05/06/2026 |
| Uploaded on | :- | 05/06/2026 |